SINTERCOM

04th February, 2021

To,
The Manager- Listing Department
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, Plot No. C/1,
G-Block, Bandra- Kurla Complex,
Bandra (E) Mumbai 400 051, India

Series EQ & Symbol: SINTERCOM

**Subject: Newspaper advertisement - Notice of the Board Meeting of Sintercom India Limited** *("the Company")*
**Reference: Regulation 30 and 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirement), Regulations, 2015** *("SEBI Listing Regulations")*

Dear Sir/ Madam,

Pursuant to provisions of Companies Act, 2013 and the SEBI Listing regulations, the Company has published Notice of the Board Meeting in the following newspapers:

- Business Standard (English)
- Kesari (Marathi)

The same is for your information and records.

Thanking you

Yours faithfully

**For Sintercom India Limited**

SINTERCOM INDIA LTD.

**Anuja Joshi**
**Company Secretary and Compliance Officer**

Enclosed: As mentioned above

SINTERCOM India Limited
(Formerly Sintercom India Pvt. Ltd.)
CIN.: L29299PN2007PLC129627

Registered Office :
Gat No. 127, At Post Mangrul, Tal.: Maval,
(Talegaon Dabhade), Pune- 410507. India.
Tel.: 0211 466 1200 | Fax: 0211 466 1202
info@sintercom.co.in | www.sintercom.co.in

6:47 PM G

...er.business-standard.com

BS Close ✕

Text Image PDF Articles

## SINTERCOM INDIA LIMITED

CIN: L29299PN2007PLC129627

Registered Office: GAT No.127, At Post Mangrul, Taluka Maval (Talegaon Dabhade) Pune 410507

Tel.: +91-20-4852-2679 Telefax: +91-20-4852-2698 Email: investor@sintercom.co.in

Website: www.sintercom.co.in

### NOTICE

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is schedule to be held on Friday, February 12, 2021, inter alia, to consider and approve the Un-audited Financial Results of the Company for the quarter ended December 31, 2020.

The said intimation is available on the Company's website at **www.sintercom.co.in** and may also be accessed on the Stock Exchange website at **www.nseindia.com.**

By order of the Board of Directors
For Sintercom India Limited
Sd/-

Place: Pune
**Anuja Joshi**
Date: February 03, 2021
Company Secretary and Compliance Officer

Notice
present ow
Road, Mulu
to 170. My
Agreement
Purchaser
and Laxmi
effect with
If any p
mentioned
my client co
If any p
kindly subm
days from t
shall be tre
**Date : 02.0**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that **share certificate 63, distinctive no.311 to 315** of **Rushi Shantinagar CHSL** at B42/43, Sector 1, Mira Road (E) Thane 401107 in name of **Mr. Vinod M. Kothari & Jt.** has been reported lost/misplaced and an application has been made to issue duplicate certificate. The Society invites claims/objections (in writing) for issuance of duplicate share certificate within 15 days from date of publication of this notice. If no claims are received during the period, society shall be free to issue duplicate share certificate.

**For & On Behalf of Rushi Shantinagar CHSL**
**Sd/-**
**Date:04.02.2021**
**Place: Mira Road, Thane (Hon. Secretary)**

## KBS India Limited

CIN: L51900MH1985PLC035718
Regd. Office: 502, Commerce House, 140, Nagindas Master Road, Fort, Mumbai -400 001
Tel: 40362626/40362727 ;
Fax : 40362618
Website : http://kbs.co.in/
Email Id : kbs@kbs.co.in

### NOTICE

Pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that the Meeting of the Board of Directors will be held on Friday, 12th February, 2021 at 03.30 P. M. at the Registered Office of the Company situated at 502, Commerce House, 140 Nagindas Master Rd, Fort, Mumbai-400001 to consider, approve and take on record the Unaudited Financial Results along with Limited Review Report for the

Phone: 1
In co
Disclosure
Board of D
04:00 P.M
Radisson
take on r
Company
Company.
In th
December
Conduct fr
2015 ('the
specified
Trading W
upto Febru
For further
www.nsei

# स्थायीच्या सदस्य पदासाठी इच्छुकांची जोरदार मोर्चेबांधणी

**पुणे :** पालिकेच्या स्थायी समितीच्या आठ सदस्यांची मुदत २८ फेब्रुवारीला संपुष्टात येत आहे. या सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यात भाजपचे सहा, राष्ट्रवादीच्या दोन सदस्यांचा समावेश आहे. त्यामुळे स्थायी समिती सदस्यपदीवर्णी लागण्यासाठी इच्छुकांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

महापालिकेतील 'स्थायी' ही अत्यंत महत्त्वाची समिती आहे. या समितीमधूनच सर्व आर्थिक बाबींचे निर्णय घेतले जातात. त्यामुळे या समितीवर वर्चस्व असणाऱ्यांचा पालिकेत बोलबाला असतो. पालिकेचा कारभार खऱ्या अर्थाने ही समिती हाकत असते. स्थायी समितीमधील सदस्यांची एकूण संख्या १६ आहे. त्यानुसार पक्षीय बलाबलाचा विचार करून स्थायी समिती सदस्यांची निवड केली जाते. त्यामुळे भाजपचे ९७, राष्ट्रवादी ४१, शिवसेना १०, काँग्रेस १०, मनसे २, एमआयएम १ निवडून आले आहेत.

पालिकेतील सत्ताधारी भाजपकडे स्थायी समितीची सूत्रे आहेत. १६ सदस्यांच्या समितीमध्ये भाजपचे १०, राष्ट्रवादी काँग्रेसचे ४, तर शिव-सेना आणि काँग्रेसचा प्रत्येकी १ सदस्य आहे. त्यांतील आठ सदस्यांचा दोन वर्षांचा कार्यकाल येत्या २८ फेब्रुवारीला संपत आहे. त्यात भाजपचे सहा सदस्य असून, त्यात हेमंत रासने, सुनील कांबळे, राजेंद्र शिळीमकर, दीपक पोटे, बंडू ढोरे, हिमाली कांबळे यांचा समावेश आहे. तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे महेंद्र पठारे आणि अशोक कांबळे यांचा कार्यकाल संपणार आहे. या सदस्यांचा कार्यकाल संपण्यापूर्वी नवीन सदस्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. या सदस्यांची नियुक्ती १६ फेब्रुवारीच्या सर्वसाधारण सभेत केली जाणार आहे. स्थायी समिती सदस्यपदासाठी भाजप, राष्ट्रवादी, या पक्षांतील इच्छुकांनी जोरदार मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे.

# जायका प्रकल्पासाठी दोन जागांच्या भूसंपादनासाठी ३० कोटींची गरज

**पुणे :** नदी सुधारणा प्रकल्पांतर्गत (जायका) मलनिःसारण प्रकल्प उभारण्यासाठी ११ जागांची आवश्यकता असून ३ जागा अद्याप ताब्यात आल्या नाहीत. यापैकी २ जागांच्या भूसंपादनासाठी रोख मोबदला देण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यात आला आहे. यासाठी ३० कोटी रुपयांची आवश्यकता आहे. मंगळवारी झालेल्या स्थायी समितीमध्ये हा प्रस्ताव आला आहे. हा दाखल करून घेण्यात आला आहे.

वारजे आणि बाणेर येथील जागेचा रोख मोबदला देण्याचा प्रस्ताव आहे. यापैकी वारजे येथील १.२६ हेक्टर जागा आहे. यामध्ये ३९ जागा मालक असून २६.२६ कोटी रोख मोबदला द्यावा लागणार आहे. खराडी येथील ६०० चौरस मीटर जागेसाठी ३.२५ कोटी इतका मोबदला द्यावा लागणार आहे. प्रशासनाने स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवला आहे. जायकाला २०१६ मध्ये मान्यता मिळाली. यावेळी या प्रकल्पासाठी ९९० कोटी रुपये इतका खर्च येणार होता. सध्या ११ ठिकाणी मलनिःसारण केंद्र बांधण्याचे काम सुरु आहे. यामुळे ३९६ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करता येईल. सध्या महापालिका ४७७ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करते. ११३ किलोमीटरची मलवाहिन्या याअंतर्गत टाकण्यात येणार आहेत. २०२२ पर्यंत हा प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन आहे. यामुळे ८७३ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया केली जावू शकते. २०२७ ची लोकसंख्या विचारात घेवून याप्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे.

# हंगामी निवृत्तिवेतन सुरू करा

**पुणे :** पुणे महापालिकेत अनेक वर्षे सेवा करून सेवानिवृत्तीनंतर हक्काचे पैसे मिळविताना होणारा मानसिक त्रास थांबविण्यासाठी प्रतिमहा १० हजार रुपये हंगामी निवृत्तीवेतन (प्रोव्हिजनल पेन्शन) सुरु करावी. पेन्शन प्रकरण पूर्ण झाल्यानंतर हंगामी व प्रत्यक्षातील निवृत्तीवेतन समायोजित करून फरकासह पेन्शन चालू करावी, असा ठराव काँग्रेसचे नगरसेवक रफिक शेख यांनी स्थायी समितीला दिला आहे.

पुणे पालिकेमध्ये ३० वर्षे व त्याहून अधिक वर्षे सेवा करून अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होतात. सेवानिवृत्त झालेल्या सेवकांना सेवानिवृत्तीच्या तारखेला पेन्शन व इतर रक्कम देणे बंधनकारक असताना प्रशासनाकडून विविध तांत्रिक कारणाने निवृत्तीच्या तारखांना पेन्शन व इतर रक्कम मिळत नाही, हा अनुभव आहे. सेवकाचे सेवा पुस्तकातील नोंदी वेळोवेळी घेतल्यास निवृत्त होताना पेन्शन व इतर रक्कमेबाबत अडचणी येत नाहीत. परंतु प्रशासनाकडून सेवापुस्तकाच्या नोंदी वेळेत न घेतल्याने पेन्शन व इतर रकमा वर्षानुवर्षे सेवकास मिळत नाही. पर्यायाने सेवकांच्या कुटुंबाचे हाल होतात, निवृत्त झालेल्या सेवकांचे नातेवाईक महापालिकेमध्ये पेन्शन व इतर रक्कम मिळण्यासाठीफिरत असतात. त्यामुळे सेवानिवृत्तीनंतर प्रतिमहा १० हजार रुपये हंगामी निवृत्तीवेतन चालू करण्यात यावी, असे ठरावात नमुद केले आहे. या ठरावावर स्थायीच्या पुढील बैठकीत निर्णय होणे अपेक्षित आहे.

# किराणा घराण्याला पं. भीमसेन जोशींमुळे मोठी उंची



पंडित भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या शुभारंभानिमित्त ज्येष्ठ टाळवादक माऊली टाकळकर यांचा विशेष सत्कार विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी (डावीकडून) सानिया पाटणकर, मीना फातर्पेकर, उपेंद्र भट, सुनील महाजन, डॉ. नितीन करमळकर, कृष्णकुमार गोयल, टाकळकर, अभ्यंकर, राजेश पांडे, निकिता मोघे, विराज जोशी, श्रीनिवास जोशी.

**पुणे :** गायन क्षेत्रात पंडित भीमसेन जोशींनी किराणा घराण्याचा ध्वज एका उंचीवर नेऊन फडकावला आहे, त्याला तोड नाही. सर्व घराण्यांचा एकत्रित अनुभव त्यांच्या सादरीकरणातून परिपूर्ण पद्धतीने घेता येतो. यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट तेवढेच महत्त्वाचे आहेत, असे मत विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांनी व्यक्त केले.

संवाद, पुणे आणि समर्थ युवा फाउंडेशनच्या वतीने भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या शुभारंभ बुधवारी करण्यात आला. त्यावेळी भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्याबरोबर ४० वर्षे साथसंगत करणारे टाळ वादक माऊली टाकळकर यांचा विशेष सत्कार अभ्यंकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी श्रीनिवास जोशी, विराज जोशी, कृष्णकुमार गोयल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, किराणा घराण्यातील गायिका मीना फातर्पेकर, गायिका सानिया पाटणकर, गायक उपेंद्र भट, राजेश पांडे, संवाद, पुणेचे प्रमुख सुनील महाजन, संवाद, पुणेच्या निकिता मोघे आदी उप-स्थित होते.

अभ्यंकर म्हणाले, भारताने संपूर्ण जगाला अध्यात्म आणि अभिजात शास्त्रीय संगीत या दोन मोठ्या देणग्या दिल्या आहेत. या दोन्ही गोष्टी समजून घेण्यासाठी संपूर्ण जगातून अनेक लोक भारतात येतात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष चोरडिया यांनी केले. निकिता मोघे यांनी आभार मानले.

जन्मशताब्दी वर्षाचा शुभारंभ आणि सत्कार सोहळ्यानंतर कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'कानन दरस करो' या कार्यक्रमात पंडित भीमसेन जोशी यांचे पुत्र आणि शिष्य श्रीनिवास जोशी यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या आणि संगीताच्या विविध पैलूंवर रचलेल्या रचनांचे सादरीकरण श्रीनिवास भीमसेन जोशी आणि विराज श्रीनिवास जोशी यांनी केले.

# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षपदासाठी मागविले अर्ज

**पुणे :** राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षपदासाठी आणि जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या सदस्यपदांसाठी नवीन ग्राहक संरक्षण कायद्यानुसार इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने दि. ३ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत हे अर्ज मागविले आहेत. www.mahafood.gov.in या संकेतस्थळावर या अर्जाबाबत माहिती उपलब्ध आहे.

नवीन ग्राहक संरक्षण कायदा २०१९ लागू करण्यात आल्यामुळे, नवीन कायद्याची आणखी प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून आयोगाची रिक्त पदे भरण्यात यावीत, अशी मागणी वकील आणि ग्राहकांकडून करण्यात येत होती. त्यामुळे आता लवकरच ग्राहक आयोगाचे कामकाज सुरळीत सुरू होण्यास मदत होणार आहे. गेली दहा महिने न्यायालयीन कामकाजावर मोठा परिणाम झाला आहे. ग्राहक न्यायालयात दावे दाखल असलेल्या पक्षकारांना याचा फटका बसला आहे. आयो-गाची रिक्त पदे भरण्यासाठी राज्य सरकारकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

दी कन्झ्युमर लॉयर्स सोसायटीचे अध्यक्ष ज्ञानराज संत म्हणाले, राज्य आयोगाचे अध्यक्ष सप्टेंबर २०२० मध्ये, न्यायिक सदस्य ऑक्टोबर २०२० मध्ये, न्यायिक सदस्य डिसेंबर २०२० मध्ये निवृत्त झाले. मात्र रिक्त पदाची जाहिरात २०२१ मध्ये प्रसिद्ध झाली आहे. आता प्रत्यक्ष नेमणूका होऊन कामकाज सुरळीत होण्यास तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लागू शकतो.

# गांजा विक्रीप्रकरणी एकाला कोठडी

**पुणे :** गांजाची विक्री केल्याप्रकरणी हिंजवडी पोलिसांनी एकाला अटक केली आहे. न्यायालयाने त्याला आठ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

संजय ऊर्फ भोला विश्वनाथ रॉय (वय ५०, हिंजवडी, मुळ रा. पश्चिम बंगाल) असे आरोपीचे नाव आहे. त्याला मंगळवारी (ता.२) हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्क परिसरातून अटक करण्यात आली आहे.


**महावितरण** — **ई-निविदा सुचना**

सासवड विभागांतर्गत वीज साहित्याची वाहतूक करणेसाठी नामांकित नोंदणीकृत अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा (टीक्र. २०/२०२०-२१) मागविण्यासाठी कोरे निविदा संच महावितरणच्या संकेत स्थळावर दि. ०४/०२/२०२१ ते ०८/०२/२०२१ पर्यंत डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील.

तांत्रिक निविदा उघडणेची तारीख १०/०२/२०२१ व वाणिज्य निविदा उघडणेची तारीख १५/०२/२०२१ काही अपरिहार्य कारणास्तव नियोजित तारखेस निविदा न उघडल्यास दुसऱ्या दिवशी उघडण्यात येतील.

सदर निविदेचे शुल्क प्रत्येकी रु. ११८०/- फक्त ऑनलाईन स्वरुपात निविदा उघडणेपुर्वी भरणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा निम्नस्वाक्षरीकाराने राखून ठेवला आहे. अधिक माहितीसाठी कृपया कंपनीचे खाली दिलेले संकेतस्थळ पहावे.

https://etender.mahadiscom.in/eatApp/

पीआरओ क्र. बाप/१६६/२०-२०२१ **कार्यकारी अभियंता,सासवड विभाग**


# देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून उस्मानीला अटक करा

## भाजपची पोलिस आयुक्तांकडे मागणी

**पुणे :** गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित करण्यात आलेल्या एल्गार परिषदेत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणात अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचा माजी विद्यार्थी शरजील उस्मानी याच्यावर स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता शरजीलवर देशद्रोहाचा गुन्हा नोंदवून त्याला तत्काळ अटक करावी, अशी मागणी भाजपच्या शिष्टमंडळाने पोलीस आयुक्तांकडे केली. या संदर्भात शहर भाजपच्या शिष्टमंडळाने बुधवारी पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांना निवेदन दिले.

शहराध्यक्ष जगदीश मुळीक, महापौर मुरलीधर मोहोळ, माजी खासदार प्रदीप रावत, आमदार सौ. मुक्ता शैलेश टिळक, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, उपमहापौर सरस्वती शेंडगे, सरचिटणीस गणेश घोष, दीपक नागपुरे, राजेश येनपुरे, दत्ता खाडे, संदीप लोणकर, युवा मोर्चाचे अध्यक्ष राघवेंद्र मानकर, तक्रारदार वकील प्रदीप गावडे यावेळी उपस्थित होते.

रावत म्हणाले, एल्गार परिषद आयोजित करण्यामागे भारतीय कम्युनिस्ट पक्ष (माओवादी) या प्रतिबंधित संघटनेचा हात होता. शरजीलवर यापूर्वी हिंसाचाराचा गुन्हा दाखल आहे. तरीही त्याला यावर्षी परिषदेत निमंत्रित करण्यात आले.

## शरजिलचा शोध सुरू : गृहमंत्री

अलिगड मुस्लिम विद्यापीठाचा माजी विद्यार्थी नेता शरजिल उस्मानी याच्यावर गुन्हा दाखल आहे. तो सध्या महाराष्ट्रात नाही. मात्र, त्याचा शोध सुरू आहे, अशी माहिती राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिली.

# उस्मानी याला मनुवादी म्हणायचे होते : कोळसे-पाटील

**पुणे** : एल्गार परिषदेच्या भाषणात शरजिल उस्मानी याला मनुवादी म्हणायचे होते, त्याऐवजी त्याने हिंदू असा शब्दप्रयोग केला. यामुळे कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी माफी मागतो, अशा शब्दांत निवृत्त न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील यांनी दिलगिरी व्यक्त केली.

कोळसे-पाटील म्हणाले, एल्गार परिषद ही मनुवाद व मनीवादाच्या विरोधात संघर्ष करत आली आहे. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य हे राजकारणाचे प्रमुख मुद्दे व्हावेत. सामान्य माणसाच्या गरजेचे प्रश्न राजकारणात प्रमुख स्थानी यावेत, अशी आमची भूमिका आहे. शरजिल उस्मानी या २४ वर्षांच्या तरुणाचे संपूर्ण भाषण ऐकावे. त्याला मनूवादी म्हणायचे होते. उस्मानी याचे भाषण सुरू असताना हे लक्षात आले नाही. अन्यथा तेव्हाच आपण त्या शब्दावर आक्षेप घेतला असता. यावरूनच सुरू असलेली बदनामी थांबवावी.


**जाहिर नोटीस**

**राजयोग ('ब') सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.**

**पत्ता : सर्वे नं. २६/४ व ३१/२+३, वडगांव खुर्द, लोकमत प्रेसमागे, लगडमळा, सिंहगड रोड, पुणे-४११०६८**

**संपर्क : ०२०-२४३००२०/*२०२**

**नोंदणी क्र. पी एन ए / पी एन ए (४)/एच एस जी/(टी सी)/९१२८/२००८-०९ दिनांक : २९/०५/२००८.**

या संस्थेचे सभासद असलेल्या व संस्थेच्या जी-२ इमारतीत **पहिला** मजल्यावरील **सदनिका क्र. ७** धारण करणारे **कै. राजू हरीचंद्र म्हात्रे** यांचे तारीख ०७/१०/२०१९ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून १५ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्याच्या वा हरकतीच्या पुष्ठर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तींकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाही, तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/ मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क, मागण्या / हरकत आल्यावर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत नोटीस दिलेल्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील. राजयोग (ब) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांच्या करिता आणि वतीने.

ठिकाण : पुणे, दिनांक : ३०/०१/२०२१ **सचिव - राजयोग ('ब') सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.**



**सिंटरकॉम इंडिया लिमिटेड**

CIN: L29299PN2007PLC129627

नोंदणीकृत कार्यालय: गट नं. 127, मु.पोस्ट मंगरूळ , तालुका मावळ (तळेगाव दाभाडे), पुणे 410507

दूरध्वनी:: + 91-20-4852-2679 टेलीफॅक्स: + 91-20-4852-2698

ईमेल: investor@sintercom.co.in वेबसाइट: www.sintercom.co.in

**सूचना**

से.बी. च्या नियमानूसार 29 सह 47 ( लीस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर आवश्यकता ) विनियम, 2015 च्या नियमावलीनुसार, नोटीस दिली गेली आहे की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक शुक्रवार, दिनांक 12 फेब्रुवारी 2021 रोजी होणार आहे. 31 डिसेंबर 2020 रोजी संपलेल्या कंपनीच्या तिमाही अन-ऑडिटेड वित्तीय निकालांचा विचार करणे आणि त्यास मान्यता देणे. ही माहिती कंपनीच्या www.sintercom.co.in या वेबसाइटवर आणि www.nseindia.com वर स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सिन्टरकॉम इंडिया लिमिटेडसाठी
सही/-
**अनुजा जोशी**
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

ठिकाण: पुणे
तारीख: 03 फेब्रुवारी 2021



BAJAJ FINSERV

**सोन्याच्या वस्तूंच्या लिलावासाठी वर्तमानपत्र सार्वजनिक सूचना**

**बजाज फायनान्स लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय: मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे-411035**

याद्वारे BFL सर्व संबंधित लोकांना आणि सर्वसामान्यांना सूचित करीत आहे की सुवर्ण कर्ज घेताना ग्राहकांनी बजाज फायनान्स लिमिटेडला सादर केलेल्या सोन्याचे दागिने खाली दिलेली खाती "जेथे आहेत त्या आधारावर आणि जसे आहेत" या आधारावर लिलाव केले जातील, सकाळी 10:00 वाजताच्या खाली नमूद केलेल्या खात्यांमधील ज्या ग्राहकांनी कर्जाच्या रकमेची परतफेड करण्यात कसूर केली असेल किंवा वारंवार सूचना दिल्या असूनही आवश्यक मार्जिन देण्यात अयशस्वी ठरले आहेत. निविदाकारांना विनंती आहे की त्यांनी इसार्याची रक्कम रु.25,000/- लिलावाच्या दिवशी रोख रकमेच्या स्वरुपात जमा करावे. निविदाकारांनी त्यांचे वैध ओळखपत्र/पॅन कार्ड लिलाव ठिकाणी सोबत बाळगावे. लिलाव स्थळ आणि लिलावाची तारीख बदलल्यास ते लिलाव केंद्रावर प्रदर्शित केले जातील. कृपया या सार्वजनिक लिलावाशी संबंधित संपूर्ण नियम व अटी ("टी व सी") https://media.bajajfinserv.in/media/finance/downloads/standard-gold-loan-terms-and-condition.pdf या लिंकवर तपासून वाचा. आपली बोली सादर करणे हे दिलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन मानले मानले जाते.

**औरंगाबाद (15-02-21):** P417GOL1137285, 1099733, 1086386, 1103614, 1137711, 1059589, 1067916

**चंद्रपूर (15-02-21):** P435GOL0731036, 0848788, 0966830, 0838320

**डहाणू, महाराष्ट्र (15-02-21):** P6Y4GOL1094322, 1100265, 1119985, 1118262

**मालेगाव (15-02-21):** P556GOL0958790, 1126804, 1110904, 1144675

**नंदुरबार (15-02-21):** P4M1GOL1058365, 1085072

**उमरगा (15-02-21):** PT75GOL1112987, 1099460

**सातारा (15-02-21):** P512GOL1088477

**बारामती (16-02-21):** P573GOL1085026, 1095941, 1105661, 1119735, 1096084, 1090644, 1088809, 1123926, 1141194, 1144874, 1143939

**गोंदिया (16-02-21):** P5E3GOL1089056, 1125798, 1144219

**कोपरगाव (16-02-21):** P479GOL1136862, 1132694, 1127603, 1096622

**वणी (16-02-21):** P4X4GOL1084905

**चिपळूण (17-02-21):** P4A2GOL1095266, 1129770, 1063592, 1144797

**जळगाव (17-02-21):** P445GOL1077941

**परभणी (17-02-21):** P483GOL1071950, 1110452, 1138579

**सावंतवाडी (17-02-21):** P6A9GOL1131568, 1088773, 1062544, 1088124

**वारणानगर (17-02-21):** P5D2GOL1135081, 1069842, 1143094

**जालना (18-02-21):** P4L5GOL1102153, 1144458

**नारायणगाव (18-02-21):** P554GOL1096732, 1129821

**रत्नागिरी (18-02-21):** P5Q9GOL1120015, 1101361

**सांगली (18-02-21):** P528GOL0698542, 1139404, 1119674, 0608316, 1144537

**उरळीकांचन (18-02-21):** PX18GOL1128128

**वर्धा (18-02-21):** P472GOL1139629, 1106663, 1139292, 1055404

**आकोट (19-02-21):** P4R3GOL0773220, 1070334, 1105572, 0888514, 1069354, 1058905, 1144971

**वसमत (19-02-21):** P6A4GOL1119722

**चाळीसगाव (19-02-21):** P4M3GOL0720345, 1072705, 1103639, 1119833, 0806835, 1144486, 1144569

**कराड (19-02-21):** P4B5GOL1092561, 1085376

**वरुड (19-02-21):** P4R0GOL1140042, 1139919, 1130321, 1099980

**जामनेर (20-02-21):** P4X3GOL1117983

**रोहा (20-02-21):** P4Y8GOL1092194

**वाशिम (20-02-21):** P4R1GOL1137523, 1106924

**भंडारा (22-02-21):** P4W1GOL1127222, 1063227, 1133885

**धुळे (22-02-21):** P4K2GOL0784055, 0826962, 1088759, 0513830, 1072233, 0661839, 0799609, 1071710, 1033938, 1082538, 1121279, 0953731, 1076879, 0976669, 0992920, 0610647, 0823992, 1059321, 1064102, 1010981, 1076791, 0924590, 0733095, 1044267, 1033175, 0993011, 1083631

**जठ (22-02-21):** P80AGOL1106970, 1140955, 1095327, 1089740, 1110424, 1140154, 1064442, 1073120

**लोणावळा (22-02-21):** P6E5GOL1119120, 1128131

**राजगुरुनगर (22-02-21):** P4X5GOL1124886, 1084332, 1089636, 1128003

**शिरपूर (22-02-21):** P4N2GOL1084883

**अमरावती (23-02-21):** P478GOL0549529, 1068807, 1089689, 1140881, 1101419

**बार्शी (23-02-21):** P529GOL1127212, 1077527

**पिंपळगाव (23-02-21):** P4R2GOL1145096

**श्रीगोंदा (23-02-21):** PU65GOL1085137, 1135268

**बुलढाणा (24-02-21):** P4G1GOL1059350, 1136874

**गंगापूर (24-02-21):** P551GOL1125766, 1140074

**इचलकरंजी (24-02-21):** P5U3GOL1088806, 1096026

**खोपोली (24-02-21):** P4Y7GOL1095749

**पेण (24-02-21):** P4W0GOL1070042, 1122988, 1096917, 0517536

**संगमनेर (24-02-21):** P4M7GOL1143272

**चाकण जीएल (25-02-21):** P30GGOL1064707, 1093214, 1085856, 1144766, 1144273

**लातूर (25-02-21):** P530GOL1069114, 1103825, 1083421, 1063015

**नाशीक (25-02-21):** P407GOL1073238, 1069719

**पंढरपूर (25-02-21):** P531GOL1055380, 1099729, 1123445, 1103258, 1112653, 1093193, 1143431

**बजाज फायनान्स लिमिटेड**